# प्रकरण ५ वे

# 'कोकरउड्या' व 'रानपालखी' आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन

# प्रकरण ५ वे

# 'कोकरउड्या' आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन

## ५.१ प्रास्ताविक :

आत्मकथन लिहिणारा लेखक आपल्या पूर्वजीवनाबद्दल लिहीत असतो. आत्मकथन म्हणजे स्वजन्मापासून ते आजपर्यंत जीवनाचा स्वत:च शोध घेणारी कलाकृती असते. प्रत्येक कलाकृतीत काही ना काही वाङ्मयीन मूल्य असते. एक वाङ्मयीन कलाकृती म्हणून या प्रकरणामध्ये 'कोकरउड्या' या आत्मकथनाचे मूल्यमापन केले आहे. आत्मचरित्रापेक्षा आत्मकथन हा वेगळ्या प्रकारचा वाङ्मय-प्रकार आहे. त्यामुळे आत्मचरित्राचे निकष व आत्मकथनाचे निकष हे वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत. आत्मकथनाच्या आधारावरच कोकरउड्याचे वाङ्मयीन मूल्य करावे लागेल. मराठी साहित्यामध्ये ज्या साहित्यिकांनी आत्मचरित्रे, आत्मकथने लिहिली. त्यापेक्षा हे आत्मकथन वेगळ्या प्रकारचे आहे. दारिद्र्याचे चित्रण केवळ दलित साहित्यातच पहायला मिळते असा अनेकांचा दावा आहे. परंतु जन्माने दलित नसणाऱ्या माणसाचे जीवन दारिद्र्यमय असू शकते हे या आत्मकथनातून दिसून येते. हे या आत्मकथनाचे वेगळेपण आहे. म्हणूनच जन्माने दलित नसणाऱ्या लेखकाला आपले अनुभव कथन करण्यासाठी 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार योग्य वाटला.

कोकरउड्या या आत्मकथनातून व. बा. बोधे यांनी आपल्या जीवनाच्या एक महत्त्वाच्या टप्प्यापर्यंतचा आलेख अत्यंत तटस्थपणे परंतु वास्तववादी स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मकथन लेखनासाठी आवश्यक असणारी तटस्थता प्रस्तुत आत्मकथनातून प्रत्ययाला येते. या कलाकृतीचे वेगळेपण, त्यातील वाङ्मयीन मूल्ये आत्मकथन या वाङ्मयप्रकारास आवश्यक असणाऱ्या वाङ्मयीन कसोट्या या अनुषंगाने कोकरउड्याचे मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

## ५.२ भाषाशैली :

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा एकूणच डोलारा हा ग्रामीण भाषिक शैलीवर उभा आहे. प्रत्येक कलाकृतीत भाषेला जसे महत्त्वाचे स्थान असते. तसेच आत्मकथनामध्ये सुद्धा भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असते. लेखक कलाकृतीसाठी जी भाषा वापरतो तीच लेखकाची भाषा असते. स्वत:च्या लेखनासाठी वापरलेली भाषा त्याच समाजजीवनातील असेल तर त्या कलाकृतीला एक प्रकारचा जीवंतपणा येतो. अन्यथा त्या कलाकृतीचा तोल ढासळतो. उदाहरणार्थ कलाकृतीत ग्रामीणतेची रचना घडताना दाखवायची असेल तर तिच्यातील पात्रे, ग्रामीण व संवाद हे ग्रामीण

भाषेतच असावयास हवे असते. म्हणजे पात्राच्या भोवतालची सामाजिक व्यवस्था, रुढी, परंपरा, भौगोलिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी कलाकृतीमध्ये येणारे समाजजीवन या सर्व घटकांतून चित्रित होणाऱ्या भाषेवर अवलंबून असते. भाषा त्या घटकांना अनुसरून आली तरच कलाकृतीचे महत्त्व वाढते. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर देश काळ परिस्थितीचा प्रभाव पडत असतो तसाच तो लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरही पडलेला असतो. म्हणून लेखकाच्या शैलीवरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना करता येते.

कोणताही लेखक असो 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या न्यायाने त्याच्या भाषेत, प्रतिमासृष्टीत व शैलीमध्ये विविधता जाणवते. 'कोकरउड्या' या आत्मकथनातील भाषेला एक वेगळे स्थान आहे. प्रस्तुत आत्मकथनातील भाषा ही ग्रामीण (जिल्ह्याची) बोली असून खास ग्रामीण ढंगाची रांगडी बोलीभाषा आहे. ती आत्मकथनात उठावदारपणे उत्स्फूर्तपणे आलेली आहे. त्यामुळे जीवनातील कोणतेही प्रसंग जीवंत करून साकार झालेले आहेत.

कोणत्याही वाङ्मयीन कलाकृतीचे स्वरूप, तिचा आशय व अभिव्यक्ती यातील नावीन्यावर उभे असते. कलाकृतीचा आशय हा भाषाशैलीचे स्वरूप निश्चित करतो.

'कोकरउड्या' या आत्मकथनात प्रारंभी स्वरूप ग्रामीण भाषेचे तर उत्तरार्धात भाषेच्या स्वरूपात फरक पडलेला आहे. 'कोकरउड्या' हे आत्मकथन घटनाप्रधान आहे. यात घटना खूप आहेत तथापी त्यामध्ये एकसूत्रता नाही. अनेक प्रसंग आणि घटना, व्यक्ती आणि आपत्ती यांचे उल्लेख आलेले आहेत. त्याचप्रमाणे नायकाच्या बाबत सर्वांग रडकथा हे एक वैशिष्ट्य जाणवते. या आत्मकथनाचा नायक वसंत दोन नंबरचा मुलगा आहे. दुसऱ्या नंबरमुळे नायकाला धाकटेपणा सहन करावा लागतो. आई, मामा, मावशी, काका, मास्तर एवढेच नव्हे तर थोरला भाऊही धारेवर धरणार या भीतीने हा सदैव भयग्रस्त आहे. ''प्रकाश आणि मी एकमेकांना चिमूट घेत बसलो. असल्या भांडणात कायम रडायची पाळी माझ्यावर.'' (कोकरउड्या, पृ. क्र. ३४) ''चार-आठ दिस गेले की आयचा मार बसायचा, काय लै मोठे कारण नसायचं.'' (कोकरउड्या, पृ. क्र. ५६) ''मी आपला मेंगळट कुणीबी उठाव चार दणक घालावं. रस्त्यात अडवून दम द्यावा.'' (कोकरउड्या, पृ. क्र. ६४) ''शाळेला उशीर झाला की मास्तर कुत्र्यावाणी मारायचं. सातवीत गेल्यावर रोज मार.'' (कोकरउड्या, पृ. क्र. ६९) वरील वाक्यावरून सर्वांग रडकथा होती हे दिसून येते.

ग्रामीण जीवन, वातावरण, परंपरा, मानसिकता या आत्मकथनातील भाषिक शैलीमुळे अचूकपणे चित्रित केल्या आहेत. त्याचबरोबर त्या काळातील आदर्श मानलेल्या व्यक्ती व आकर्षक वाटणाऱ्या व्यक्तींचे उल्लेख आत्मकथनात येऊन गेलेले आहेत. या सर्वच निवेदनासाठी लेखकाने व्यावहारिक किंवा प्रत्यक्ष समाज जीवनातील वापरलेली भाषा जाणीवपूर्वक वापरलेली आहे, असे दिसते. उदाहरणार्थ - ''फेटा बाराबंदी घालणारा तो म्हातारा फुलागत दिसायचा.'' (कोकरउड्या, पृ. क्र. ११२) ''तेव्हांचा प्रकाश बदलला, साने गुरुजी झाला.'' (कोकरउड्या, पृ. क्र. १३८) ''सरांनी इनशर्ट केला की सुनील दत्तसारखे दिसायचे.'' (कोकरउड्या, पृ. क्र.१२५) ''प्रकाश .... राहायचा हेचात राजेश खन्नागत बघावं तेव्हा शर्मिला टागोरच्या शोधात.'' (कोकरउड्या, पृ. क्र. १४०) इत्यादी आकर्षक व्यक्तीचे उल्लेख या आत्मकथनात आलेले आहेत.

बोधे यांचे बालपण हे सातारा जिल्ह्यातील दुधी या गावी गेल्याने त्यांच्या आत्मकथनात सातारी बोलीतील अनेक शब्द आले आहेत. उदा. दुमती, टकशेन, फैयना, किरड्या, इरड, बोकड, मुडद्या, रांडच्या, बाबू, तिरडी, भयाभंग, रंडकी असे पुष्कळसे शब्द आले आहेत. त्याचप्रमाणे काही रानातील खाद्यपदार्थ यांचाही समावेश होतो. उदा. 'रानगाढव'. अशाप्रकारे 'कोकरउड्या' या आत्मकथनात ग्रामीण बोली भाषेचा आविष्कार होतो.

## ५.३ निवेदन शैली :

आत्मकथनात निवेदनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. या निवेदनात अधिकाधिक ओघवतेपणा आणून आपली कलाकृती अधिक यशस्वी करण्याचा प्रयत्न करीत असतो. आत्मकथन प्रभावी होण्यासाठी निवेदन हा महत्त्वाचा घटक आहे. आत्मकथनामध्ये प्रसंग, घटना, विषय इत्यादींमध्ये असणाऱ्या उणिवा निवेदनाच्या सहाय्याने लेखक भरून काढतो. वाचकाला जर आत्मकथनात गुंतवून ठेवायचे असेल तर आत्मकथनात घटनांबरोबर निवेदनाला महत्त्वाचे स्थान दिले गेले पाहिजे. 'कोकरउड्या' या आत्मकथनामध्ये याच प्रकारच्या निवेदन शैलीचा प्रत्यय येतो.

'कोकरउड्या' हे आत्मकथन लेखकाने अत्यंत वास्तववादी स्वरूपात लिहिले असल्यामुळे त्यातून ''एक प्रांजळ आणि निर्मळ मनाचा आविष्कार झाला आहे.''[१] असे मत ग्रामीण साहित्यिक आनंद यादव यांनी मांडले आहे. याचा प्रत्यय 'कोकरउड्या' वाचताना येतो. आत्मकथनाचे स्वरूप कथात्मक परंतु लालित्यपूर्ण झाले आहे. आत्मकथनामध्ये अनेक घटना प्रसंग आले आहेत. व्यक्ती व व्यक्तींवर येणाऱ्या आपत्तीचे अनेक ठिकाणी उल्लेख आलेले आहेत. परंतु ते विस्कळीतपणे आले

आहेत. त्याचप्रमाणे नायक वसंताच्या वाट्याला धाकटेपणामुळे कुटुंबातील दुजाभाव आलेला आहे. वसंताच्या घरी जन्मापासून अठराविश्व दारिद्र्य असल्याने, त्याने प्रसंगी पोटाची भूक भागवण्यासाठी तत्कालीन धोंडी मागण्याच्या लोक परंपरेचा अवलंब केला आहे. वडील नोकरीच्या ठिकाणी बाई ठेऊन स्वत: मजा मारत, त्यामुळे घराकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष होते. दिवाळीसारखा सण सुद्धा लेखकाच्या घरी होत नाही. कपडेलत्ता सुद्धा त्यांना दिवाळीला मिळत नाहीत.

दिवाळीचे गोडधोड पदार्थ मिळवण्यासाठी नायक लोकपरंपरेने चालत आलेल्या परंपरांचा यथायोग्य उपयोग करतो. त्यात काही लोकगीतांचा आधार घेतला आहे.

**''दिन दिन दिवाळी**
**गाय माझी ववाळी**
**गाय कुणाची**
**लक्ष्मणाची**
**लक्ष्मण कुणाचा**
**आईबापाचा**
**दे ग माई खोबऱ्याची वाटी**
**वाघाच्या पाठीत**
**घालीन काठी''** (कोकरउड्या, पृ. क्र. १२)

अशा लोकगीतांचा आधार घेऊन गावातील प्रत्येक घरापुढे म्हणायचे. काही घरांतील बायका हसत. कुणी गुळखोबरे, पणतीमध्ये तेल ओतत असे. अशाप्रकारे वसंता दिवाळी सणाचा आनंद लुटीत असे. आत्मकथनाची निवेदनपद्धती प्रथमपुरुषी आत्मनिवेदनात्मक आहे. आत्मकथेमध्ये नायकाने स्वत:च्या जीवनाचे तटस्थपणे चित्रण केले आहे. उदा. रहिमतपूरमध्ये इयत्ता दहावीमध्ये शिकवत असताना पहिल्या तासाचा अनुभव, रहिमतपूर गावातील मुलीच्या प्रेमात पडणे, प्रेमप्रकरणामुळे औषध घेणे, वडिलांचे जेवण चालू असताना घडलेला प्रसंग. अशा अनेक प्रसंगांचे चित्रण आत्मकथनात प्रांजळपणे मांडले आहे. तसेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ग्रामीण संस्कृतीशी नाळ असलेल्या खेड्यात झाली असल्याने निवेदनात आलेली भाषा ही ग्रामीण बोली असून तिचा उपयोग करून सुटसुटीत अशी वाक्यरचना वापरली असल्याने निवेदनाला एक प्रकारचा जीवंतपणा आलेला आहे.

## ५.४ वातावरणनिर्मिती :

'कोकरउड्या' आत्मकथन म्हणजे 'स्व' कथन आहे. या आत्मकथनात ग्रामीण परिसर उभा करू शकला आहे. वडील बाबासाहेब बोधे हे सरकारी खात्यामध्ये नोकरीस असून सुद्धा त्यांच्या छंदीफंदी स्वभावामुळे ते घराकडे लक्ष देत नव्हते. आई हौसाबाई काबाडकष्ट करून प्रपंच्याचा गाडा मुलांसह ओढत आहे. या हौसाबाईवरती अनेक कठीण प्रसंग येतात. सासू-सासरे व दीर हौसाबाईस त्रास देत असतात. याचे प्रत्ययकारी चित्रण प्रस्तुत आत्मकथनात लेखकाने मांडले आहे.

एकदा घरामध्ये पीठ नसताना वसंताला भूक लागली, त्यावेळी वसंताने मित्रांच्या सहकार्याचे गावातून धोंडी काढून प्रत्येक घरातून अन्न गोळा केले व आपल्या मित्रासह आपली भूक भागवली. असे एक ना अनेक प्रसंग या आत्मकथनात आलेले आहेत.

प्रस्तुत आत्मकथन मराठी समाजातील व्यक्तीचे आहे. त्यामुळे मराठा समाजातील रुढी-परंपरा यांचे यथार्थ दर्शन या आत्मकथनातून घडते. त्याचबरोबर तत्कालीन समाजातील कथा अंधश्रद्धा याचेही दर्शन या आत्मकथनात घडते.

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा नायक हा जन्माने दलित नसून सुद्धा दलितांच्या प्रमाणे त्याने दारिद्रयाचे चटके सोसले आहेत. नायक वसंताच्या मनावरती शिक्षणाचे संस्कार झाले आहेत. त्यामुळे तो सतत नोकरीसाठी धडपडत राहतो. अखेर त्याला नोकरी मिळते. लहानपणी सोसलेल्या दारिद्र्याचे चटके नायकाच्या मनात कायम घर करून राहतात.

कोणतीही कलाकृती यशस्वी होण्यासाठी, त्यामध्ये उत्कटता येण्यासाठी वातवरणनिर्मिती हा घटक महत्त्वाचा असतो. वातावरण निर्मिती ही कलाकृतीची गरज म्हणूनच येत असते. कलाकृतीतील प्रसंगांना, घटनांना अनुसरून वातावरण आले पाहिजे अशी त्या कलाकृतीचीच मागणी असते.

प्रा. बोधे यांनी 'कोकरउड्या' या आत्मकथनात हे राखलेले दिसते. ग्रामीण भागातील रूढी-परंपरा-संस्कृती, सणवार यांचे दर्शन घडताना दिसते. ग्रामीण वातावरण प्रसंग, परिसर बोली, आली आहे. त्यामुळे 'कोकरउड्या' हे आत्मकथन उत्कृष्ट असे ग्रामीण आत्मकथन म्हणता येईल.

## ५.५ प्रसंग वर्णन :

बोधे यांनी 'कोकरउड्या'या आत्मकथनात अनेक प्रसंगांचे चित्रण मोठ्या कौशल्याने तसेच परिणामकारकरीत्या केले आहे. त्यात अतिशयोक्ती नाही किंवा प्रसंगांची स्वत: ओढून ताणून केलेली नाही. कलाकृतीच्या आशयाला आवश्यक साजेसे असे वातावरण आहे. त्याचबरोबर प्रत्येक प्रसंग

विशिष्ट क्रमाने घडत आहे. त्यात कुठेही कृत्रिमता दिसून येत नाही. ओघाओघानेच तो येतो. तसे पाहता बोधे यांचे हे महत्त्वाचे कौशल्य म्हणता येईल.

बोधे यांनी प्रत्येक प्रसंग सांगताना त्यामध्ये कोणताही आडपडदा ठेवला नाही. याचा प्रत्यय अनेक प्रसंगांतून येतो. उदा.लेखकाच्या घरी पावसाच्या दिसतात दोन-दोन दिवस चूल पेटत नसे. त्या प्रसंगाच्या वेळचे वर्णन करताना लेखका म्हणतो - ''रानामाळांतून फिरून तिनं गोळा करून आणलेली पातरीची, कुरडूची भाजी पात्याल्यात मीठ टाकून उकडायचा प्रत्येकाला चतकूर न्हायतर अर्धी भाकरी वाटणीला याची...'' (कोकरउड्या, पृ. क्र. ४४) अशा अनेक प्रसंगाचे वर्णन लेखकाने केले आहे. अशा अनेक प्रसंगांतून व. बा. बोधे यांनी कलाकृतीला जीवंतपणा आणण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक प्रसंगातून त्यांच्या घरातील दारिद्र्याचे व उपासमारीचे दर्शन घडते.

## ५.६ कोकरउड्या आत्मकथनातील चित्रमय शैली :

'कोकरउड्या' या आत्मकथनामध्ये लेखकाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे चित्रण आलेले आहे. त्यामधील काही प्रसंगाचे चित्रण हे चित्रमय शैलीने आले आहेत. एखाद्या प्रसंगाचे वर्णन वाचताना त्याचक्षणी त्या प्रसंगाचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहणे हे या आत्मकथनाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'कोकरउड्या' या आत्मकथनाच्या नायकाचे माणसांवर, निसर्गावर, शेतीवरती, गावावरती, गावातील सणावारांवरती, यात्रेवरती, देवदेवतांच्या देवळांवरती त्याचबरोबर पशुप्राण्यांवर प्रेम आहे. या आत्मकथनातून त्याच्या सर्वांचे चित्रण आले आहे. लेखकाचे बालपण ग्रामीण भागात गेल्याने त्यावरती ग्रामीण भागाचा प्रभाव असल्याने त्याचे साहित्यात चित्रण आले आहे. केवळ निसर्गवर्णना-साठी निसर्गवर्णन किंवा प्राण्यांचे वर्णन येत नाही. ते सहजपणे येते.

हे अनुभवविश्व ग्रामीण जीवनातील आहे. त्यामुळे ग्रामीण परिसर वाचकांच्या डोळ्यांसमोर ठसठसीतपणे उभा राहतो. एखाद्या चित्रपटासारखा तो प्रसंग उभा राहतो. या आत्मकथनातील काही निसर्गवर्णन - 'मनगटागत ताट.' (कोकरउड्या, पृ. क्र. ७) 'झाडाचा मणकानं मणका ढिला हुईल अशी वाऱ्याची तरा.' (कोकरउड्या, पृ. क्र. १७) 'बाभळीच्या गाठीवाणी याकाक पोर हाय माझं.' (कोकरउड्या, पृ. क्र.१६). 'हडळीच्या चेहऱ्यावाणी पाण्याचा रंग.'(कोकरउड्या, पृ. क्र.३२) 'च्या सारख पाणी सपाट्याव पळत हुंत.' (कोकरउड्या, पृ. क्र. १०३) 'चक्रीवादळागत मास्तर तणाणत याचं.' (कोकरउड्या, पृ. क्र. १०९) 'अंगावर फणसावानो काटा टरारला वता.' (कोकरउड्या, पृ. क्र.१०४) इत्यादी अनेक वर्णने चित्रमयशैली पद्धतीने या आत्मकथनात आली आहेत.

चित्रमय शैली हे लेखकाचे कौशल्य म्हणता येईल. लेखकाला आलेले सर्वच अनुभव त्यांनी योग्य रीतीने वर्णन करताना काही कौशल्ये व तंत्रे वापरली. त्यामुळे आत्मकथनाची लोकप्रियता वाढण्यास मदत झाली असे म्हणावे लागेल.

## ५.७ 'कोकरउड्या'तील प्राणिवर्णन :

'कोकरउड्या' या आत्मकथनामध्ये अनेक प्रसंग, घटना, पात्रांचे चित्रण आलेले आहे. त्याचप्रमाणे विविध प्राण्यांचे चित्रण हे 'कोकरउड्या'चे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अगदी सहजपणे आलेले आत्मकथलाचे शीर्षक - 'कोकरउड्या' मोर देवाचा रंगीत खजाना. (कोकरउड्या, पृ. क्र. १८) 'पोळं-पोळागत पोसायला मोकळ न्हाय.' (कोकरउड्या, पृ. क्र. २३) नागसाप मदने गुरुजीचे वर्णन 'एवढ्या वर्षानंतरही या नागाचा करारीपणा कायम होता. फणीवरचा दहाचा आकडा तसाच कायम होता.' (कोकरउड्या, पृ. क्र. ४२) 'टकुऱ्यात नाटक इटूळं घालून बसल होते.' (कोकरउड्या, पृ. क्र. १०६) 'डोळ्यांपुढे अक्षर नागावाणी वळवळाय लागली.' (कोकरउड्या, पृ. क्र. १११) 'कुणीही मेलेल्या सापागत त्याला हाकलीत.' (कोकरउड्या, पृ. क्र. १४५) 'बेडूक गळ्याखालचा भाता हलवीत म्हाताऱ्या बाबागत बसून राहायच्या.' (कोकरउड्या, पृ. क्र. ४३) लेखकाच्या कुटुंबाचा एक घटक असणाऱ्या शेळीचे वर्णन करताना लेखक म्हणतात, 'धार-धार पाठशिंगी डोळ मरीआयवाणी हनुवटीच्या खाली लोंबणारी दाढी मागल्या दोन्ही फऱ्यावली दाट कयास .. जटा लोंबल्यावाणी लोंबायच.. काळीमिट शेळी गंध लावण्यावाणी तोंडाव पांढर पट्ट ... (कोकरउड्या, पृ. क्र. ५४) वासरं - अवकाळ (तरणी पोरे) लें उधळायची. (कोकरउड्या, पृ. क्र. १०७) सशाच कान भुईतन वर आल्यावाणी केळतोडाची बारीक उगवत्याली. (कोकरउड्या, पृ. क्र. ११०)

अशा प्रकारची वर्णने या आत्मकथनात आलेली आहेत. ग्रामीण भागाचे प्रत्ययकारी चित्रण येते. त्याचबरोबर त्या भागातील लोकांचे प्राण्यांवरील प्रेम दिसून येते.

## ५.८ संवाद कौशल्ये :

आत्मकथनात घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा या घटकांना महत्त्व असते. तेवढेच संवाद या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. संवाद हे माध्यम कथा, आत्मकथा, कादंबरी इत्यादीपेक्षा नाटकामध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरतो. नाटकामध्ये प्रत्येक प्रसंग खुलवण्यासाठी व प्रभावीपणे मांडण्यासाठी संवादाला महत्त्वाचे स्थान असते. नाटक उठावदारपण होण्यासाठी लेखकाला संवाद सहाय्यक ठरतो. त्याचप्रमाणे

आत्मकथनातील सर्व घटना प्रसंगांचे चित्रण करण्यासाठी त्याचप्रमाणे घडलेल्या घटना सांगण्यासाठी संवादकौशल्य महत्त्वाचे असते. त्याने आत्मकथनास जिवंतपणा येण्यास मदत होते.

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा विचार करता असे लक्षात येते की बोंधे यांच्याकडे संवादाच्या माध्यमातून आशय अभिव्यक्त करण्याचे कौशल्य आहे. जी व्यक्ती संवाद बोलते आहे. ती व्यक्ती ज्या समाजातील वा वर्गातील आहे. त्यानुसार आत्मकथनात भाषा आलेली आहे. प्रस्तुत आत्मकथनाचा नायक, त्यांचे मित्र व इतर पात्रांमध्ये झालेले संवाद ग्रामीण बोलीभाषेतील आहेत. त्यामुळे ग्रामीण परिसर वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

आत्मकथनातील घटना, प्रसंग, निसर्गवर्णने अचूक शब्दांमध्ये करण्यास लेखक यशस्वी झालेले आहे. उदाहरणार्थ - 'हडळीच्या चेहऱ्यावाणी पाण्याचा रंग.' (कोकरउड्या. पृ. क्र. ३१) 'च्या सारख पाणी सपाट्याव पळत हुतं.'(कोकरउड्या, पृ. क्र. १०३) इत्यादीसारख्या संवादामधून अचूक चित्र डोळ्यासमोर उभे करण्यामध्ये लेखक यशस्वी झालेला आहे. म्हणून शंकरानंद येडगे म्हणतात, " 'कोकरउड्या' ही ग्रामीण मनाचे जिवंत दर्शन घडवणारी आत्मकथा आहे."[२] येडगे यांनी मांडलेले मत योग्य आहे. 'कोकरउड्या' आत्मकथनातून तेथील समाज रूढी परंपरा यांचेही दर्शन होते.

'कोकरउड्या' या आत्मकथनाची भाषा बोलीभाषा आहे. त्याचबरोबर लेखकाजवळ संवाद-कौशल्य असल्याने हे आत्मकथन लोकप्रिय ठरेलच त्याचबरोबर ते मनाला भिडणारे आहे.

'कोकरउड्या' या आत्मकथनाच्या बोलीबाबत एके ठिकाणी प्रकाश इनामदार म्हणतात, "सातारी बोलीचा साज आणि बाज जागोजाग नजरेत भरल्याशिवाय रहात नाही."[३] प्रकाश इनामदार यांचे विधान या आत्मकथनातील संवाद हे सातारी बोली भाषेतील असल्याने संवादांना सातारी बोली भाषेचा एक प्रकारचा साज आणि बाज आहे. त्यामुळे आत्मकथनाची परिणामकारकता व आत्मकथनाची उंची वाढते.

'कोकरउड्या' या आत्मकथनात सातारी बोलीभाषेतील म्हणींचा व वाक्प्रचारांचा योग्य उपयोग संवादातून केला आहे. त्यामुळे संवादाला योग्य अशी जोड मिळाल्याने संवाद परिणामकारक व मनाला भिडतात. म्हणून 'कोकरउड्या' या आत्मकथनाला प्रकाश इनामदार, "हृदयस्पर्शी कोकरउड्या"[४] म्हणतात. खऱ्या अर्थाने योग्य वाटते कारण या आत्मकथनातील अनेक प्रसंग हृदयाला स्पर्श करणारेच आहेत.

'कोकरउड्या' या आत्मकथनाच्या श्रेष्ठत्वामध्ये लेखकाच्या संवाद कौशल्याचा मोठा वाटा आहे. यातील संवाद अतिशय ठसकेबाज, गावरान बोलीभाषेतून असल्याने वाचकांचे लक्ष वेधून घेणारे आहेत.

## ५.९ आत्मकथनाची वैशिष्ट्ये :

आत्मकथन या वाङ्मयप्रकाराची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. ''समूहभावना, भूकेचे चित्रण, समाजचित्रण, 'स्व'च्या जाणिवा, स्त्रीदर्शन आणि ग्रामीणता अशी महत्त्वाची आत्मकथनाची वैशिष्ट्ये.''[५] डॉ. वासुदेव मुलाटे यांनी सांगितली आहेत व वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने 'कोकरउड्या' या आत्मकथनाची काही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

### ५.९.१ भूकेचे व दारिद्रयाचे चित्रण :

'कोकरउड्या' या आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणून भुकेचे व दारिद्रयाचे चित्रण सांगता येईल. दारिद्रय हे लेखकाच्या पाचवीलाच पुजले आहे. आर्थिक परिस्थितीबरोबरच भुकेचा प्रश्न नायकाच्या पुढे संकट म्हणून उभा राहतो. प्रत्येक वेळी भुकेने व दारिद्रयाने ग्रासलेला असल्याने त्याला दारिद्रयाचे चटके सहन करीत जगावे लागते. शिक्षण पूर्ण करण्यासाठी अनेक संकटांना सामोरे जावे लागते. कोरभर भाकरीसाठी गावातून धोंडी काढावा लागतो. शिक्षण पूर्ण करूनसुद्धा बेकारीच्या काळात स्वत:च स्वत:ची पुस्तके गावोगाव फिरून विकावी लागतात. अशा अनेक प्रसंगांचे चित्रण या आत्मकथनातून साकारते. म्हणून या आत्मकथनाचे भुकेचे व दारिद्रयाचे चित्रण हे वैशिष्ट्य सांगता येते.

### ५.९.२ स्त्रीदर्शन :

'कोकरउड्या' या आत्मकथनातील स्त्री ही सोशिक आहे. आपल्यावरती पदोपदी होणारा अन्याय सहन करत जगणारी आहे. होणाऱ्या अन्यायाविषयी वाचा न फोडता अबोलपणे आपला फाटका संसार संभाळणारी आहे. आत्मकथनातील नायकाची आई हौसाबाईच्या वाट्याला एकंदरीत दु:खच आलेले आहे. सासरच्या त्रासाला कंटाळून ती माहेरी जाते. परंतु माहेरीसुद्धा कष्ट उपसावे लागले. त्याचबरोबर अपमानास्पद वागणूक मिळते. सासू-सासरे, दीर त्याचबरोबर नवरा यांचा त्रास सहन करीत ती संसाराचा गाडा ओढताना दिसते. पावसाळ्याच्या दिवसांत स्वयंपाक लवकर झाला नाही म्हणून सासूने पावसाच्या धारा कोसळत असतानासुद्धा लहान मुलांसह घराबाहेर काढले. त्यावेळी लहान मुलांसह रात्री पावसात नवऱ्याला भेटायला गेली. त्यावेळी सुद्धा नवऱ्याकडून भरपूर मार खावा लागला. प्रापंचिक जीवनामध्ये हौसाबाईला अत्यंत खडतर अशा प्रसंगांना सामोरे जावे लागले.

कितीही अन्याय झाला तरी तिच्या ठिकाणी दु:खाला सामोरे जाण्याची तयारी होती. एकूणच हौसाबाईच्या अंगी सोशिकता हा महत्त्वाचा गुण दिसून येतो.

**५.९.३ ग्रामीणता :**

'कोकरउड्या' या आत्मकथनाच्या वैशिष्ट्यांपैकी ग्रामीणता हे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल. बहुतांशी ग्रामीण लेखक आता शहरवासी झालेले असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ग्रामीण भागात झालेली असते. त्यामुळे अनेक आत्मकथनांतून ग्रामीणतेचे दर्शन घडते. त्याचप्रमाणे 'कोकरउड्या' या आत्मकथनात ग्रामीणता आलेली आहे. लेखकाचे बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे त्याच्या मनावर ग्रामीण जीवन-संस्कृतीचा प्रभाव पडलेला प्रस्तुत आत्मकथनातून दिसून येतो.

'कोकरउड्या' या आत्मकथनात लेखकाने पारंपरिक म्हणी, वाक्प्रचार यांचाही उपयोग केला आहे. 'आई मरावी आणि मावशी जगावी', 'मिजास राजाची अन् वागण कैकाड्याचे', 'अंगाचा ससा होणे' या शिवाय आत्मकथनात काही सातारी बोलीभाषेतील शब्दांचा सहज उपयोग करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| फटाफटा = लवकर | शाव = शेव | वैतुग = वैताग |
| चाण्णी = चांदणी | जाळी = जाणे | पर्सदि = प्रसाद |
| राच्ची = रात्रीची | परक्षा = परीक्षा | मेंदाळ = भरपूर |
| टांगड = पाय | बेडाक = बेडूक | लै = भरपूर |
| हीर = विहीर | सव = सवय | पैली = पहिली |
| टाळक्याव = डोक्यावर | झॉप = झोप | शेण्डी = शेवणे |
| लुंग = ज्वारीचे कणीस | रोळावं = रस्त्याव | कंच्या = कोणन्या |
| वांडरागत = वानरागत | | |

अशा प्रकारचे अनेक सातारी बोलीतील ग्रामीण शब्द आलेले आहेत. त्याप्रमाणेच इंग्रजी शब्दांचा वापरही आत्मकथनात केला आहे. उदा. पब्लिक, प्रॉम्टिंग, विंग, बेस्ट, सेंटर, स्टॅंडअप, इनशर्ट, अॅक्सिडेंट, कॉलेज, रिटन टेस्ट, वेलकम पार्टी, थॅंक्यू, कॉंग्रेच्युलेशन इत्यादी.

**५.९.४ सामाजिकता :**

कोणत्याही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण तो ज्या समाज व्यवस्थेमध्ये लहानाचा मोठा होतो, तेथील सामाजिक, धार्मिक, राजकीय, भौगोलिक वातावरणाचा परिणाम त्या लेखकाच्या

वैचारिक जडणघडणीवर झालेला असतो. समाजाला बाजूला ठेवून त्याची कलाकृती निर्माण होत नाही. त्याने निर्माण केलेल्या कलाकृतीत समाजाचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे उमटते. लेखकाला कोणतीही कलाकृती निर्माण करताना समाजातील बऱ्याच घटकांचे भान ठेवावे लागते. कलाकृतीला अनुरूप अशा पार्श्वभूमीवर आपणांस 'कोकरउड्या' या आत्मकथनाचा विचार करावालागतो.

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा नायक वसंता हा परिस्थितीशी अतूटपणे बांधला गेलेला आहे. त्यामुळे वसंताच्या सभोवताली असणाऱ्या ज्या सामाजिक, आर्थिक वातावरण निर्माण झालेल्या व्यवस्थेवर वसंताची वैचारिकता पोसलेली आहे. त्यामुळे वसंताच्या लेखन प्रक्रियेवर तत्कालीन परिस्थितीचा, वातावरणाचा प्रभाव पडलेला दिसतो. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असताना अनेक अडचणीवर मात करून शिक्षण घेतले. पुस्तक विकण्यासाठी भटकत असताना काही समाजांतील लोकांनी त्यांना नावे ठेवली. याचीच दुसरी बाजू म्हणजे वसंताच्या धाडसाचे कौतुक समाज करीत आला आहे. या सर्वांबरोबरच समाजातील अनेक चालीरीती, श्रद्धा-अंधश्रद्धा, परंपरा यांचे उल्लेख प्रसंगातून आलेले पहावयास मिळतात.

## ५.१० मुखपृष्ठ व शीर्षकाची यथार्थता :

'कोकरउड्या' या आत्मकथनाचे मुखपृष्ठ हे अत्यंत सूचक आहे. मुखपृष्ठावरती सभोवताली हिरवळ असून डोंगरदऱ्या काट्याकुट्यांचा प्रदेश चित्रित केलेला दिसून येतो. मुखपृष्ठावरील चित्रावरून निसर्ग मोहक व अल्हाद असा आहे. हिरवळीवरून चालणारा मुलगा व त्याच्यामागे धावणारे शेळीचे कोकरू आहे. मुखपृष्ठावरील चित्राचा विचार करता ते आशयाशी विसंगत असले तरी एका दृष्टीने हे मुखपृष्ठ, त्यावरील चित्र योग्य वाटते कारण लेखक स्वत: जरी दारिद्र्यामध्ये होरपळून निघत असला तरी त्याची भाकरीसाठी व नोकरीसाठी चाललेली भटकंती कराड, सातारा, कोरेगाव या परिसराशी निगडित आहे. या परिसराला कृष्णा-कोयना या नद्यांची मोठी देणगी लाभली आहे. त्याने तो परिसर दाट हिरवळीचा, डोंगरकपारीचा असल्याने लेखकाची या परिसरातून जडणघडण, त्या परिसरातील हिरवळीतून नायकाचे व्यक्तिमत्त्व घडले त्यामुळे मुखपृष्ठावरील चित्र लेखकाच्या खडतर जीवनावर प्रकाश टाकणारे आहे. लेखकाच्या जीवनात जे खडतर प्रसंग आलेले आहेत त्या सर्वांचा विचार करता मुखपृष्ठावरील चित्र योग्य वाटते.

कड्याकपारीवरील हिरवळीचा कड्याकपारीचा काट्याकुट्यांचा, खडतर परिसरांचा बाऊ न करता कडेकपारीवरील हिरवळीचा शेंडा खाण्यात एखाद्या शेळीचे निरागस कोकरू जसे आपल्या

आईच्या सोबत मिळेल तो बोरीबाभळीचा पाला खोडून जगते. नेहमी आईभोवती कोकरउड्या घेते तशाच प्रकारच्या कोकरउड्या नायकाने घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोकरू जसे येईल त्या प्रसंगावर मात करण्याचा प्रयत्न करते. तसाच प्रयत्न नायकाने केला असावा. म्हणून 'कोकरउड्या' हे शीर्षक योग्य वाटते.

## ५.११ समारोप :

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा एकूणच आवाका लक्षात घेण्यासाठी आत्मकथनातील वाङ्मयीन गुणवत्ता शोधावी लागते. प्रस्तुत प्रकरणामध्ये 'कोकरउड्या' या आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे. आत्मकथनातील प्रसंग, संवाद, भाषाशैली, निवेदन शैली, वातावरण, प्राणी वर्णन इ. वाङ्मयीन घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला आहे.

मराठी साहित्यामध्ये आत्मकथन या वाङ्मय प्रकाराने एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यात दलित आत्मकथनाची संख्या ग्रामीण आत्मकथनांच्या मानाने खूपच आहे. त्यामुळे ग्रामीण आत्मकथनांकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. म्हणून कोकरउड्या या आत्मकथनाचा स्वतंत्रपणे विचार केला आहे. प्रस्तुत आत्मकथनात ग्रामीण भागातील दारिद्र्याचे, समाजजीवनाचे, रूढी-परंपरांचे, श्रद्धा-अंधश्रद्धांचे दर्शन घडवणारे एक आत्मकथन आहे. महाराष्ट्रातील खेड्यांची अवस्था काय आहे ? याची नेमकेपणाने जाणीव करून देणारे आत्मकथन म्हणून 'कोकरउड्या' या आत्मकथनाचा उल्लेख करावा लागेल.

## ५.१२ निष्कर्ष :

१. 'कोकरउड्या' या आत्मकथनात आलेली भाषा ही अस्सल ग्रामीण बोलीभाषा असून पुढे ती काही प्रमाणात नागर स्वरूपाची झाली आहे.

२. 'कोकरउड्या' या आत्मकथनात अनेक लोक परंपरांचा त्याबरोबरच लोकगीतांचा समावेश झालेला दिसून येतो.

३. प्रा. बोधे यांनी 'कोकरउड्या' या आत्मकथनातून ग्रामीण भागात लहानपणी खेळल्या जाणाऱ्या खेळाचे दर्शन घडवले आहे.

४. बोधे यांनी आत्मकथनात अनेक प्रतीकांचा वापर केला आहे.

५. परिस्थितीशी सतत संघर्ष करणाऱ्या, कडवी झुंज देऊन जगणाऱ्या माणसाचे चित्रण 'कोकरउड्यात' आले आहे.

६. 'कोकरउड्या' या आत्मकथनातून शिक्षण कमी असणाऱ्या परंतु व्यवहारज्ञान असणारी कष्टाळू, पतिनिष्ठ व मुलांच्या शिक्षणासाठी रानात राबणाऱ्या सोशिक हौसाबाईच्या स्वभावाचे दर्शन घडते.

७. 'कोकरउड्या' या आत्मकथनातून खेड्यातील रूढी-परंपर, सण-वार, उत्सव, यात्रा यांचे प्रभावी चित्रण आले आहे.

८. 'कोकरउड्या'तून ग्रामीण भागातील प्राण्यांची वर्णने आली आहेत.

९. 'कोकरउड्या' म्हणजे दारिद्रयाने ग्रासलेल्या एक आई आणि मुलगा यांच्या संघर्षाची कहाणी होय.

१०. 'कोकरउड्या'तून ग्रामीण भागाचे, निसर्गाचे तसेच रानात घेतल्या जाणाऱ्या पिकांचे चित्रण आलेले आहे.

## संदर्भ सूची


१. आनंद यादव यांचे पत्र दि. ३/८/१९९३ (व. बा. बोधे यांच्या वैयक्तिक मंग्रहातून)

२. येडगे शंकरानंद : ग्रामीण मनाचे जिवंत दर्शन घडवणारी आत्मकथा 'कोकरउड्या' दै. ग्रामोद्धार, लातूर दि. १०/१०/१९९३

३. इनामदार प्रकाश : हृदयस्पर्शी 'कोकरउड्या', दै. प्रभात, दि. २५ जुलै १९९३

४. इनामदार प्रकाश : तत्रैव

५. मुलाटे वासुदेव : 'सहा दलित आत्मकथने : एक मुक्त चिंतन' कैलास, पृ. १९८५, पृ. ७१


-----x-----

# 'रानपालखी' आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन

## ५.१ प्रास्ताविक :

आत्मकथन लिहिणारा लेखक आपल्या पूर्व जीवनाबद्दल लिहीत असतो. आत्मकथन म्हणजे स्वत:च्या जीवनात घडलेल्या घटना, प्रसंगांचा तटस्थतेने घेतलेला आढावा होय. हा आढावा घेत असताना लेखक एक प्रकारे स्वत:च्या जीवनाचा शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतो. तसा शोध घेत असताना त्याला स्वत:शी प्रामाणिक व तटस्थ रहावे लागते. आपल्या मनातील सुखदु:ख, भावना हे इतरांना सांगण्यासाठी, स्वत:चे मन हलके करण्यासाठी आत्मकथन हा प्रभावी वाङ्मयप्रकार आहे. म्हणून अनेकांनी आत्मकथने लिहिली आहेत. प्रत्येक कलाकृतीमध्ये कोणते ना कोणते वाङ्मयीन मूल्य असतेच. एक वाङ्मयीन कलाकृती म्हणून प्रस्तुत प्रकरणात 'रानपालखी' या आत्मकथनाचे मूल्यमापन केले आहे. आत्मचरित्रापेक्षा आत्मकथन हा वेगळ्या प्रकारचा वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे आत्मचरित्राचे निकष व आत्मकथनाचे निकष हे वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. आत्मकथनाच्या कसोट्यावरच 'रानपालखी'चे मूल्य मापन करावे लागेल. मराठी साहित्यात ज्या साहित्यिकांनी आत्मचरित्रे, आत्मकथने लिहिली आहेत, त्यापेक्षा 'रानपालखी' हे वेगळ्या प्रकारचे आत्मकथन आहे.

'रानपालखी' या आत्मकथनात व. बा. बोधे यांनी २६ जुलै १९७६ पासून ते २००३ पर्यंतचा प्राध्यापक झाल्यापासूनचा संपूर्ण जीवनपट रानपालखीतून चित्रित केला आहे. तो चित्रित करत असताना अत्यंत तटस्थपणे परंतु वास्तववादी स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मकथन लेखनासाठी आवश्यक असणारी तटस्थता प्रस्तुत आत्मकथनातून प्रत्ययास येते. या कलाकृतीचे वेगळेपण, त्यातील वाङ्मयीनमूल्य, आत्मकथन या वाङ्मयप्रकारास आवश्यक असणाऱ्या वाङ्मयीन कसोट्या त्या अनुषंगाने रानपालखीचे मूल्यमापन करता येईल.

## ५.२ भाषाशैली :

'रानपालखी' या आत्मकथनाचे वेगळेपण त्या कलाकृतीच्या भाषिक शैलीवरती आहे. प्रत्येक कलाकृतीमध्ये भाषेला महत्त्वाचे स्थान असते. आत्मकथनामध्ये सुद्धा भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लेखक कलाकृतीसाठी जी भाषा वापरतो तीच लेखकाची भाषा असते. स्वत:च्या लेखनासाठी वापरलेली भाषा त्याच समाजजीवनातील असेल तर त्या कलाकृतीला एक प्रकारचा उठावदारपणा व जिवंतपणा येतो. कलाकृती जर ग्रामीण समाज जीवनावर आधारित असेल तर तिच्यात येणारी भाषा,

व्यक्तिरेखा, संवाद, निवेदन प्रसंग इ. ग्रामीणच असणे महत्त्वाचे आहे. व्यक्तिरेखांच्या भोवतालची सामाजिक व्यवस्था, रूढी, परंपरा, भौगोलिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी, कलाकृतीमध्ये येणारे समाजजीवन या सर्व घटकांतून कलाकृतीची भाषा प्रतिबिंबित होते. भाषा त्या घटकांना सुसंगत असेल तर कलाकृतीचे मूल्य वाढते. प्रत्येक लेखकावर देश-काल परिस्थितीचा प्रभाव पडलेला असतो. म्हणून लेखकाच्या भाषाशैलीवरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येऊ शकते.

'रानपालखी' या आत्मकथनाची भाषा ही नागर व ग्रामीण अशी संमिश्र स्वरूपाची आहे. स्थल-कालानुसार या आत्मकथनाची भाषा बदलत गेली आहे. लेखकाने आपल्या गावातील अनुभव, घटना, प्रसंग यांचे वर्णन करताना आलेली भाषा ही ग्रामीण बोलीभाषा आहे. लेखकाचे बालपण हे ग्रामीण भागात गेल्याने त्यांच्या मनावरती ग्रामीण भाषेचा ठसाउमटला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील ग्रामीण बोलीचा परिणामकारक वापर प्रस्तुत आत्मकथनात आहे.

'रानपालखी' या आत्मकथनाच्या भाषेसंदर्भात डॉ. सुधाकर भोसले म्हणतात, ''लेखकाची लेखनशैली आकर्षक आहे. ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटताना लेखकाने ग्रामीण बोलीची तसेच अनेक ग्रामीण शब्दांची चपखल योजना केली आहे.''[१] डॉ. सुधाकर भोसले यांचे मत सार्थ वाटते. व. बा. बोधे यांनी रानपालखीतून ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात ग्रामीण भागातील शब्दांची चपखल योजना केलेली दिसते. त्यामुळे कलाकृतीला एक प्रकारे जीवंतपणा आलेला आहे.

टाक, लुडक, भिताड, नरडं, टायम, म्होरं, झुनक ठिक्यात,झुरके, चुटकी, कार्ट, पॉरबीर, पिवळी धमक, वराड, दुमतं, पातळ, सुगी, बापे, गावंदर, हळदीच्यापोरी, भंडारा, पारावर,पारंग, कुंदा, मुराळी, कडबा, काटणी, मळणी, भुसभुशीत, घाणवट, राणवा, ताफा, पार, दुरडीबर, पेदाड, लेपाट, जागा, पिंजार इ. अशा प्रकारच्या शब्दांचा यथायोग्य वापर बोधे यांनी केला आहे.

'रानपालखी' या आत्मकथनात बोधे यांनी कष्टकरी शेतकरी, भटक्या - विमुक्त, तळागाळातील समाजातील कोल्हाटी, नंदीवाले, फासेपारधी, गोपाळ, कानफाटी, गोसावी, कातकरी, गोंधळी, माकडवाले, कल्हईवाले, पोतराज, डवरी, कैकाडी, त्याचबरोबर तमासगीर तसेच सरंजामी वृत्तीचे श्रीमंती लाभलेले बागायतदार यांच्या जीवनाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. त्यांनी या सर्वांचे जीवन जवळून अनुभवले आहे. त्यामुळे रानपालखीतून आलेली भाषा ही त्या समाजातील लोकांची भाषा आहे. तसेच त्यांच्या भाषेतील म्हणी, वाक्प्रचारांचा शिरकाव केला आहे. 'खिळ घालणे'

(रानपालखी, पृ.७), ''कानामागून आला तिखट आला'' (रानपालखी, पृ.३४), ''खंडीच्या वरणात मुतणारी जात'' (रानपालखी, पृ.२१६) अशा प्रकारच्या म्हणींमुळे व वाक्प्रचारांमुळे आत्मकथनाची परिणामकारकता वाढण्यास मदत झाली आहे.

रानपालखीची भाषाशैलीही साधी, सोपी, सरळ अशी असून काही ठिकाणी ग्रामीण तर काही ठिकाणी नागर अशा दोन्ही प्रकारची भाषाशैली रानपालखीतून येते. त्याचबरोबर बोधे यांनी पारिभाषिक शब्दांचा प्रसंगानुरूप अचूक वापर केला आहे. प्रस्तुत आत्मकथनात इंग्रजी भाषेतील शब्दांचीही रेलचेल आहे. 'बलब' (रानपालखी, पृ.२७), 'रेसली' (रानपालखी, पृ.१३४), 'डेफरी' (रानपालखी, पृ.१५७) तसेच इंग्रजी व हिंदी भाषेतून संवादरचना झाल्याचे दिसते. बारगजे या व्यक्तिरेखेच्या तोंडचे संवाद हिंदी भाषेतील आहेत. ''वह भी एक जमाना था.... जब पसीना गुलाब था।'' (रानपालखी, पृ. ६) त्याचबरोबर इंग्रजी शब्दांचाही 'व्हाट इज धिस', 'चपाती इजर टर्नश्न टूब लेदर' (रानपालखी, पृ.६). अशा प्रकारच्या भाषेचा समावेश झाल्याने संवादाला वेगळेपण निर्माण झाले आहे.

रानपालखीतून काही पात्रांच्या तोंडून मराठी चित्रपटातील दादा कोंडके यांच्या गीतांचाही समावेश आहे. 'गालावरती खळी तुण्या लावी वेड मला.'' ''गालावरती तुझ्या खळं .. ज्वारी मळू दे मला।'' (रानपालखी, पृ.६) वरील गीतांच्या पंक्तीमुळे रानपालखीची रंजकता वाढण्यास मदत झाली आहे. रानपालखीची भाषा कधी हळुवार तर कधी इरसाल गंभीर, तर कधी एकदम स्वच्छ निखळ असल्याचे जाणवते. काही ठिकाणी वाक्यरचनेतून व्यक्त होणारा आशय हा चित्रदर्शी वाटतो.

बोधे यांनी सोमेश्वराच्या ठिकाणाचे वर्णन करताना वापरलेली भाषाशैली ''आसपासच्या वसाहती दूध पिऊन झोपलेल्या लेकरासारख्या.'' (रानपालखी, पृ.५) ''विश्वास पाटील (लेखक) तसे स्वभावाने भाबडेच. जांभळ खाऊन खिसा रंगवणाऱ्या गावाकडच्या पोरासारखे.'' (रानपालखी, पृ.१७०). अशा प्रकारच्या वाक्यरचनेतून प्रस्तुत प्रसंगाचे चित्रण वाचकांसमोर येते. त्यामुळे रानपालखीची भाषा ही चित्रदर्शी भाषा आहे, असे म्हणावे लागेल. यातून बोधे यांच्या लेखनशैलीचे एक वेगळेपण दिसून येते.

'रानपालखी' या आत्मकथनाच्या भाषेसंदर्भात डॉ. यशवंत पाटणे म्हणतात, ''त्यांच्या आत्मचरित्राची भाषा नाटकी नाही. ती झऱ्यासारखी नादमय व प्रवाही आहे. त्यामुळे रानपालखी हे बोधे यांच्या जीवनातील जमाखर्चाचे सांस्कृतिक संचित आहे.''[२] डॉ. यशवंत पाटणे यांचे मत योग्य

वाटते. रानपालखीतील भाषेचा विचार करता त्यातील भाषा ही नाटकी नसून ती ओघाने आलेली जीवंत व प्रवाही भाषा वाटते. तिच्यात अकृत्रिम भाव जाणवतात.

या आत्मकथनाच्या भाषेच्या संदर्भात आ. वि. साठे म्हणतात, ''ग्रामीण बोलीच्या विविध छटा चितारल्या आहेत. ग्रामीण वाक्प्रचार आणि म्हणी यांचा फार मोठा खजिना मराठी सारस्वताला बहाल केला आहे.''[३] आ. वि. साठे यांच्या मताचा विचार करता त्यांचे मत योग्य वाटते. बोधे यांनी रानपालखीतून ग्रामीण बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार, उपमा, प्रतिकांचा यथायोग्य वापर केल्याने वाचकांना रानपालखीचा आस्वाद घेताना ग्रामीण शब्दांचा, म्हणींचा, वाक्प्रचारांचा खजिना सापडल्यासारखे वाटेल.

व. बा. बोधे यांनी रानपालखीतून त्यांच्या वास्तव जीवनाचा जवळजवळ २५ वर्षांचा जीवनपट उलघडला आहे. त्यांना या काळात अनेक जातिधर्मांची, वेगवेगळ्या व्यवसायांतील, वेगवेगळ्या परिसरांतील माणसे भेटली. त्यांच्या सहवासात त्यांनी खूप काही अनुभवले. त्यामुळे स्थळकाळानुसार व व्यक्तिपरत्वे, त्यांच्या भाषाशैलीत परिवर्तन झाल्याचे दिसते. त्यांची भाषा प्रवाही व बदलत गेल्याने त्यांच्या लेखनशैलीत परिवर्तन झाल्याने रानपालखीची भाषा संमिश्र स्वरूपाची वाटते

रानपालखीच्या भाषेसंदर्भात डॉ. सुधाकर भोसले म्हणतात, ''लेखन प्रवाही, प्रासादिक, आनंदी, उसळतं, खळाळतं , कुठे स्तब्धसं, कुठे धावतं, अडखळतं, कुठे दगडधोंड्याच्या फटीतून निखळतं पाणी. तसे हे लेखन. त्या त्या भावनेचा रंग आपल्या अंगात थेंबाथेंबांत मुरवून त्यांची भाषा नितळ पाण्याप्रमाणे तो तो रंग आत्मसात करून तिची प्रकृती करते. भाषा कधी हळूवार, कधी इसाल, कधी गंभीर, कधी मिस्कील.''[४] वरील मतांचा विचार करता बोधे यांची भाषा प्रसंगानुरूप बदलत गेली आहे. याचा प्रत्यय येतो.

## ५.३ निवेदन शैली :

आत्मकथनामध्ये निवेदनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. लेखन निवेदनात अधिकाधिक ओघवतेपणा आणून आपली कलाकृती अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करीत असतो. आत्मकथन प्रभावी होण्यासाठी निवेदलन हा महत्त्वाचा घटक आहे. आत्मकथनामध्ये प्रसंग, घटना, विषय इ. मध्ये असणाऱ्या उणिवा निवेदनाच्या साहाय्याने लेखक भरून काढतो. वाचकाला आत्मकथनात गुंतवून ठेवायचे असेल तर आत्मकथनामध्ये इतर घटनांबरोबर निवेदनाला महत्त्वाचे स्थान दिले गेले पाहिजे. रानपालखी या आत्मकथनामध्ये याच प्रकारच्या निवेदनशैलीचा प्रत्यय येतो.

'रानपालखी' हे आत्मकथन लेखकाने अत्यंत तटस्थपणे व वास्तव स्वरूपात मांडले आहे. आत्मकथनाच्या घटना-प्रसंगातील चैतन्य हरवू न देता बोधे आपल्या जीवनाचा आलेख मांडतात. रानपालखीतील निवेदन हे प्रत्यक्ष निवेदनातून असलेले दिसते. यांनी केलेल्या निवेदनात कुठेही खंडता दिसत नाही. ते सलग एकापाठोपाठ एक घटना प्रसंग येतात. त्यातील कोणताही भाग आगंतुक किंवा ओढून-ताणून अथवा उपरा वाटत नाही. अधूनमधून विवेचक मजकूर लिहून लेखनाला निबंधासारखी डूब द्यावी किंवा रंजक, चटकदार प्रसंगाची योजना करून लेखन करावे असा प्रयत्न केलेला जाणवत नाही. हे व. बा .बोधे यांच्या निवेदनशैलीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

आत्मकथनाच्या निवेदना संदर्भात प्राचार्य रमणलाल शहा म्हणतात, ''व. बा. बोधे यांच्या रानपालखीत स्वत:च्या स्तुतीचा एकही शब्द नाही. स्वत:कडे तटस्थपणे पाहून त्यांनी या आत्मकथेत प्रांजळ व प्रामाणिक निवेदन केले आहे.''[५] प्राचार्य रमणलाल शहा यांचे मत योग्य वाटते. व. बा. बोधे यांनी आत्मकथनात केलेले निवेदन हे प्रांजळ व प्रामाणिक निवेदन आहे. याचा प्रत्यय प्रस्तुत आत्मकथनातून येतो.

रानपालखीतील निवेदनशैली ही अगदी साधी, सुटसुटीत अशी आहे. या निवेदनावरून त्यातील व्यक्तिरेखांचे स्वभावदर्शन होते. निवेदन स्थलकालपरत्वे त्याबरोबर प्रसंगानुसार बदलते. त्याने सर्व घटना, प्रसंगांना जीवंतपणा येतो.

## ५.४ वातावरणनिर्मिती :

'रानपालखी' या आत्मकथनातील भाषाशैली, निवेदनशैली त्याचबरोबर वातावरणनिर्मिती हा घटकसुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे. लेखकाने प्रस्तुत आत्मकथनात घटना प्रसंगाची मांडणी करताना वातावरणनिर्मिती प्रसंगाला अनुरूप अशी केल्याने आत्मकथनाचा आशय, भाषा त्याचबरोबर सर्व प्रसंग समजण्यास मदत होते.

रानपालखीची भाषा ग्रामीण तसेच नागर बोलीभाषा असल्याने लेखकाने मांडलेले प्रसंग किंवा त्यावेळचे वातवरण हे त्या त्या परिसरातील, वातावरणास सुसंगतपणे निर्माण केल्याने आत्मकथनाची परिणामकारकता वाढली आहे. लेखकाने वापरलेली भाषाशैली काहीशी चित्रदर्शी असल्याने मांडलेल्या प्रसंगाचे चित्रण व वातावरण वाचकाच्या डोळ्यापुढे चित्रित होते. ही एक लेखकाची कसोटी म्हणता येईल. प्रत्येक कलाकृतीला प्रसंगानुसार वातावरण असते. परंतु वातावरणनिर्मिती, घटना, प्रसंगांना सुसंगत असेल तर कलाकृतीला जिवंतपणा प्राप्त होतो.

रानपालखीची भाषा चित्रमयशैलीत असल्याने एखाद्या प्रसंगाचे वर्णन करताना भावुकता निर्माण करते. तर कधी प्रश्नार्थकतेचा भाव घेते. आपल्या गावातील बदलत्या परिस्थितीचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ''गावं आता विकृत होत चाललीत. माणुसकी राहिली नाही. दिलेला शब्द पाळतील याची खात्री नाही. त्यांना फक्त स्वत:चा स्वार्थ कळतो. सरळ प्रामाणिक माणूस गाठायचा. अडचणी आणायचा. पैसा लुबाडायचा. बरं ते पैसे संसारात गुंतवलीत याची खात्री नाही. गांजा ओढणारं, दारू पिणारं, पुन्हा दोघं तिघं असले की साऱ्या गावाचा पंचनामा. त्यांनी त्यांच्या पैशाचं कायं करायचं हा त्यांचा प्रश्न आहे. पण किमान स्वत:च्या संसाराची काळजी करावी. यांचे संसार उभे असतात ते कष्टकरी माउलीच्या जिवावर. चुलीत लाकूड जळतं असतं आणि चुलीज्वळ ती जळत असते. हे खपणं जळणं यांना अंतर्मुख का करत नाही ? जन्मापासून कानावर भगवंताच नाव पडूनही हे लोक का बदलत नाहीत. खरोखर सगळेच धारकरी ज्याला त्याला पहिल्या धारेची.'' (रानपालखी, पृ.३१-३२) वरील प्रसंगातून लेखकाने आपल्या गावातील बदलत्या परिस्थितीचा आढावा घेतला असून अशी ग्रामीण जीवनातील दु:खे, दु:खाची सल निर्माण करताना लेखकाने केलेली वातावरण निर्मिती एक वेगळे रूप धारण करते. एका बाजूने प्रश्नांचा ठाव घेते तर दुसऱ्या बाजूला वाचकांना अंतर्मुख करून जाते.

रानपालखीतील घटना प्रसंगांचे वर्णन करताना येणारी वातावरणनिर्मिती उपमांचे रूप धारण करते. सोमेश्वरनगरचे वर्णन करताना म्हणतो, ''सोमेश्वरनगर गाव तसं सुस्तावलेलं. एक तप उलटून गेलं तरी नव्या वसाहतीचा अंगरखा अजूनही अंगावर असलेला. एकीकडे कारखाना धडाडत रहायचा... आसपासच्या वसाहती दूध पिऊन झापलेल्या लेकरासारख्या कायम पेंगुळलेल्या. कॉलेज एक बाजूला खडकावर मरिआईचा गाडा टाकल्यासारखं.... बघावं तिकडं ओसाड. एकटेपणा प्रखरतेने जाणवायचा.'' (रानपालखी, पृ. ५) अशा उपमांनी वातावरणनिर्मिती झालेली प्रत्ययास येते.

रानपालखीतील वातावरणनिर्मिती ही ग्रामीण पार्श्वभूमीचा वेध घेणारी आहे. तशीच ती शहराकडील काही गोष्टींचा वेध घेणारीही आहे. शिवाय एका ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकरी घरातील एका मुलाच्या मनातील भावविश्वाचाही वेध घेणारी आहे. तर कधी कधी वातावरणनिर्मिती ही तत्त्वज्ञानाची मांडणी करणारी दिसते. वातावरणनिर्मितीमध्ये संयम हे बोधे यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

रानपालखी या आत्मकथनातील इतर घटकांसोबत वातावरणनिर्मिती ही सर्व घटना, प्रसंग, संवादांना सुसंगत असल्याने आत्मकथनाला एक वेगळ्या प्रकारची रंजकता आल्याचे जाणवते. व. बा. बोधे यांनी या आत्मकथनाची वातावरणनिर्मिती प्रसंगानुरूप केल्यामुळे या आत्मकथनाची उंची वाढलेली आहे.

## ५.५ प्रसंगवर्णन :

बोधे यांनी रानपालखी या आत्मकथनातून अनेक प्रसंगांचे वर्णन मोठ्या कौशल्याने तसेच परिणामकारकपणे केले आहे. त्यात अतिशयोक्ती नाही किंवा प्रसंगांची रचना ओढून ताणून केलेली नाही. कलाकृतीच्या आशयाला आवश्यक व साजेसे असे वातावरण आहे. प्रत्येक प्रसंग हा क्रमाक्रमाने घडत आहे. त्यात कृत्रिमता दिसून येत नाही. त्याचा प्रत्यय रानपालखीत येतो. लेखकाची लेखनशैली आकर्षक आहे. प्रसंगांचे चित्रण करताना प्रत्येक प्रसंग उठावदारपणे आलेला आहे. त्यात क्लिष्टता जाणवत नाही. तो प्रसंग आशयाशी सुसंगत वाटतो. हे बोधे यांच्या लेखनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

या आत्मकथनात लेखकाने अनुभवलेल्या अनेक प्रसंगांचे चित्रण केलेले आहे. ते प्रसंग लेखकाने चित्रित करताना चित्रमय शैलीचा उपयोग केल्याने प्रत्येक प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. प्रसंगांचे चित्रण करताना लेखक स्वत:च्या जीवनातील प्रसंगांची प्रांजळपणे मांडणी करतो. त्याच्यात कुठेही नाटकीपणा जाणवत नाही. त्यांच्याकडून झालेल्या चुकांचे वर्णनही प्रांजळपणे केलेले आहे. यातून बोधे यांची प्रांजळवृत्ती दिसते. लग्नवेळीच्या संदर्भात लेखक म्हणतो, ''उंच, गोरीपान, सुरेल मुलगी पसंत पडली. पण मला वाटलं. मलाच ती नकार देते काय ?'' (रानपालखी, पृ.५८) ''दुसऱ्या कोणी सांगून गैरसमज होऊ नये म्हणून लग्न झाल्यावर पत्नीच्या पहिल्याच भेटीत लेखकाने आपली दोन प्रेमप्रकरणं आणि आत्ता त्याचा काहीही संबंध नसल्याच सांगितल.'' (रानपालखी, पृ.६३) ''पहिलं मूल लहान असताना पत्नीला दिवस गेले. त्यामुळे गर्भपात करावा लागला .... त्यामुळे तब्येत ढासळली ती कायमचीच. हे सारं बेफिकीरी वृत्तीमुळ झालं.'' (रानपालखी, पृ.१०२-१०३) असे अनेक प्रसंग व. बा. बोधेंच्या प्रांजळपणाची साक्ष देणारे आहेत. शिवाय नोकरीतील काही प्रसंग, घरबांधणीचे प्रसंग, खेड्यातील बदलत्या परिस्थितीचा वेध, ग्रामीण भागातील दु:ख, विद्यार्थ्यांच्या स्थितीचा वेध घेणारे प्रसंग अशा अनेक प्रसंगांचे चित्रण बोधे यांनी केले आहे. बोधे हे सूक्ष्म तपशिलांनी प्रसंगाचे वर्णन करतात. त्यामुळे प्रत्यक्ष तो प्रसंग डोळ्यासमोर एखाद्या चित्रपटासारखा उभा राहतो.

रानपालखीतील काही प्रसंग हे चटपटीत तर काही चिंताग्रस्त. त्याचबरोबर काही प्रसंगांतून प्रसन्नता जाणवते तसेच काही प्रसंगांतून दु:खाची छाया पसरते. लेखकाने आईच्या मृत्यूच्या प्रसंगाचे केलेले वर्णन हे मनाला चटका लावून जाते. ''तिन निरवानिरवीची भाषा सुरू केली होती. प्रकाशरावांनी मला सगळं सांगितले. आई म्हणाली, 'गावाकडे जात जा. घरात दिवा लावत जा. शेणकुटं, जळण रहिमतपूरला आणून ठेव ... मांजर वेलंगला सोडून दे. कुलूप नीट लावत जा. देव्हाऱ्यावरील देव आणा. बापूंच्या टाकाची पूजा करा. मंगळवार गाठून चौंडाईदेवीला निवद दाखवत चला. घरावर लक्ष ठेवा. दगडधोंडा संभाळा....'' (रानपालखी, पृ.२७३) असे प्रसंग वाचताना वाचकाच्या डोळ्यापुढे तो प्रसंग उभा राहतो. त्याचबरोबर प्रत्यक्ष आपलीच आई त्या प्रसंगात असल्यासारखे वाटते व तो प्रसंग मनाला चटका लावून जातो.

व. बा .बोधे यांनी आपण काय जगलो ? कसे लगलो ? याचा आलेखच रानपालखीतून मांडला आहे. ते एखाद्या प्रसंगात गुरफटून जात नाहीत. संयमितपणा हा त्यांच्या भाषेचा गुण असल्याने व उत्तम वक्ता हा गुण त्यांच्या लेखनाला फायदेशीर ठरला आहे असे वाटते. कथानक ला गती देणारे प्रसंग व प्रसंगांना ग्रामीण बोलीचा आधार हे ही महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येतील. काही प्रसंग सूक्ष्म तपशील घेऊन येतात तर काही प्रसंगांना गतिमानता असल्याचे जाणवते.

## ५.६ 'रानपालखीतील' चित्रमयशैली :

'रानपालखी' या आत्मकथनामध्ये लेखकाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे चित्रण आलेले आहे. त्यामधील काही प्रसंगांचे चित्रण हे चित्रमय शैलीने आले आहे. एखाद्या प्रसंगाचे वर्णन वाचताना त्याचक्षणी त्या प्रसंगाचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. हे आत्मकथनाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

रानपालखी या आत्मकथनाच्या नायकाचे आपल्या गावावरती, गावातील माणसांवरती त्याचबरोबर गावातील जत्रा, देव, देवांवरती, प्राण्यांवरती प्रेम आहे. त्याचबरोबर रानमाळीत राबणाऱ्या त्यांच्या आईवरती विशेष जीव आहे. गावची यात्रा म्हणजे त्यांच्या जिवाचा प्राण म्हणावा लागेल. यात्रेच्या दिवसाचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ''यात्रेच्या मुख्य दिवशी वातावरण तंग होतं.वाद झालेली इनामदाराची कार्टी सकाळीच पिऊर तर्र होती. लेका पैसा आमचा आणि मालक आलाय ह्यो. कसा तमाशा होतोय तेच बघतो. मला वाईट वाटलं पारावर बसलो. गावात चक्कर मारली. सारा विरोधी सूर.'' (रानपालखी, पृ. १६५) वरील प्रसंगावरून लेखकाच्या गावातील यात्रेचे चित्रण डोळ्यांपुढे येते.

सोमेश्वरनगरमध्ये लेखक ज्या ठिकाणी राहाते, त्या ठिकाणचे वर्णन करताना बोधे लिहितात, ''मी राहायचे जर्मन शेडला. एकात एक तीन खोल्या. रचना मालगाडीच्या डब्यासारखी मधल्या खोलीतला माणूस रताळ्यासारखा उखडून निघेल अशी तऱ्हा .... पुढच्या खोलीला लागूनच उभ्या-आडव्या-तिरक्या लाकडी पट्टया मारलेल्या चौकटीला लागूनच ही जाळीदार खिडकी.''

वरील प्रसंग वाचताना त्या प्रसंगांचे चित्रण डोळ्यापुढे तरंगू लागते. लेखकाचे बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे त्यांच्या मनावर ग्रामीण संस्कृतीचा ठसा उमटला आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून त्या संसकृतीचे चित्रण आले आहे. निसर्गवर्णनासाठी निसर्ग वर्णन किंवा प्राण्यांचे वर्णन येत नाहीत. ते सहजपणे येतात. ग्रामीण जीवनातील हे अनुभवविश्व आहे. त्यामुळे ग्रामीण परिसर वाचकांच्या डोळ्यासमोर ठसठशीतपणे उभा राहतो.

चित्रमय शैली हे लेखकाचे कौशल्य म्हणता येईल. लेखकाला आलेले सर्वच अनुभव त्यांनी योग्य रीतीने वर्णन करताना काही कौशल्य व तंत्रे वापरली. त्यामुळे आत्मकथनाची लोकप्रियता वाढण्यास मदत झाली असे म्हणता येईल.

## ५.७ रानपालखीतील प्राणिवर्णन :

रानपालखी या आत्मकथनात अनेक प्रसंग, घटना, व्यक्तिरेखांबरोबरच विविध प्राण्यांची वर्णन आलेली आहेत. प्राण्यांची वर्णन हे रानपालखी या आत्मकथनाचे वेगळेपण म्हणता येईल. लेखक स्वत:चे व मित्रांचे वर्णन करताना सहज म्हणून जातो. ''तो सशाच्या गतीनं धावणारा ... मी मांजराच्या पिलासारखा मोकळ्या भांड्यात डोकावणारा.'' (रानपालखी, पृ. ११) ''कासवासारखा झरा धरून राहणारा.'' (रानपालखी, पृ.११) 'शेरडं', 'मासे', 'खेकडे', 'साप', 'फुलचुखी', 'चिवळं', 'घुबड', 'कोंबडी'। (रानपालखी, पृ.१५) लेखकाच्या वडिलांच्या स्वभावाचे वर्णन करताना, ''ह्यो वाघाच्या काळजाचा.'' (रानपालखी, पृ.१५) कुत्र्याचे वर्णन, ''टिऱ्या कुत्रा माकडासारखा. ढान्या वाघासारखा, वाघाच्या काळजाचा.'' (रानपालखी, पृ.२४) ''गाढवात राहणारी महागाढवं.'' (रानपालखी, पृ.३२) ''कोल्हापूरचा काळा घोडा.'' (रानपालखी, पृ.३२) ''गाढवाच्या बेंबींना कस्तुरी लावण्याचा उद्योग करायचा.'' (रानपालखी, पृ.५३) ''रेशीमकिड्यासारखा.'' (रानपालखी, पृ.९७) ''कुत्र्यावाणी चेलमडला.'' (रानपालखी, पृ.९६) ''एका दिवसात पोरांना मांजरांचा लळा लागल.'' (रानपालखी, पृ. १३१) लेखकाने रानपालखीत केलेली प्राण्यांची व पाखरांची वर्णने ही आत्मकथनाची परिणामकारकता वाढवतात.

रानपालखीत आलेली वर्णने ही उपमा, प्रतिमा म्हणून केलेली आहेत. त्यामुळे आत्मकथनातील घटना, प्रसंग, निवेदन यांना जीवंतपणा येतो. रानपालखीत आलेल्या प्राण्यांच्या वर्णनामुळे रानपालखी या आत्मकथनास वेगळेपण लाभले आहे असे म्हणता येईल.

## ५.८ संवादशैली :

'रानपालखी' या आत्मकथनात घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा, निवेदन या घटक महत्त्वाचे आहेत. तेवढेच संवादाला या आत्मकथनात महत्त्वाचे स्थान आहे. एखाद्या नाटकातील रंजकता वाढवण्यासाठी संवाद जसे महत्त्वाचे कार्य करतात. त्याचप्रकारे आत्मकथनातील प्रत्येक घटना, प्रसंग यांना जीवंतपणा व आत्मकथनातील आशय स्पष्टीकरणासाठी संवादाला महत्त्वाचे स्थान असते.

कोरेगाव तालुक्यातील दुधीच्या कृष्णाकाठावरून सुरू झालेला त्यांच्या जीवनाचा प्रवास नोकरीच्या निमित्ताने पुरंदर तालुक्यातील नीरा काठावर स्थिरावला. या प्रवासात त्यांना भेटलेल्या विविध प्रवृत्तींची माणसे व त्यांच्या सहवासात आलेले अनुभव मांडताना बोधे यांची लेखणी वेगवेगळी रूपे धारण करते. रानपालखीची भाषा ही ग्रामीण बोलीभाषा असल्याने पात्रांच्या तोंडचे संवाद हे काही प्रमाणात ग्रामीण बोलीतील आहेत. लेखकाच्या गावातील व्यक्तींचे संवाद हे ग्रामीण स्वरूपाचे आहेत. त्याचबरोबर लेखकाच्या सहवासात अनेक जाति-जमातींच्या व्यक्ती आल्या. त्यांच्याशी लेखकाचा झालेला सुसंवाद यातून त्यांच्या वेगवेगळ्या लकबी आत्मकथनातील संवादातून दिसतात.

रानपालखीतील संवाद कधी हळूवार, कधी गंभीरता कधी मिस्कील असलेले दिसतात. तर काही संवाद खटकेबाज येतात. विशेषत: लेखकाच्या आईच्या तोंडचे संवाद, "जाऊ नक मुडद्या वर सगळ्या काचा हायत्या बालाच्या. त्या भाड्यानं कुठ कुठ वायरी गुंतीवल्यात्या." (रानपालखी, पृ.३१) यासंवादातून एक ठसकेबाज पणाची कल्पना येते. त्यांच्या आईच्या संवादातून ग्रामीण भागातील इरसाल शिव्यांचाही समावेश झाला आहे. "हे बघ महदा फक्त पन्नास रुपये देणं राहिलं तेवढं द्या." "पहिली हत्यार आणं दारं तासाय लाग. मग देतो." "राव इसवास न्हायं व्हय ?" (रानपालखी, पृ.३२) वरील संवादातून उपरोधिकता जाणवते. तसेच संवादातून ग्रामीण म्हणींचा यथायोग्य उपभोग झाला आहे. "गाढवाच्या बेंबीला कस्तुरी लावायचा उद्योग करतोय." (रानपालखी, पृ. ५३) अशा प्रकारच्या म्हणींमुळे संवादाला रंजकता आलेली आहे. त्याचबरोबर लेखक लहान असताना त्यांची आई त्यांना म्हणायची, "सारख काय बामनावाणी पुस्तक घिवून बसायच असत." (रानपालखी, पृ.५१) अशा प्रकारच्या संवादातून उपमांचा वापर झाला आहे. लेखक एके ठिकाणी म्हणतो,

''शेतकऱ्याची कमाई मोट नाड्यात हिजड्याची कमाई दाढी बोडण्यात आणि कवीची कमाई एसटी भाड्यात जाती.'' (रानपालखी, पृ. ४६) अशा प्रकारच्या संवादातून लेखकाच्या मनातील आशय स्पष्ट होतो.

रानपालखीतील संवाद हे आशयाला सुसंगत आहेत. त्याचबरोबर स्थळकाळानुसार संवादात ग्रामीण बोलीभाषेचा तर कधी नागर बोलींचा आविष्कार केला आहे. रानपालखीतील संवादातून विनोदाची झालर आलेली आहे. ''तो विडंबन छान करायचा. दादा कोंडक्याच्या चित्रपटातल एक गीत तेव्हा गाजत होते. 'गालावरती खळी तुझ्या, लावी वेड मला.' बारगजे पोज घ्यायचा. हात उंच करायचा आणि म्हणायचा 'गालावरती ज्वारी तुझ्या, मळू दे मला । मजा असायची'.'' (रानपालखी, पृ.६) अशा संवादातून विनोदी शैलीचा प्रत्यय येतो.

रानपालखीतील या आत्मकथनात लेखकाच्या संवादकौशल्याचा महत्त्वाचा वाटा आहे. रानपालखीतील संवाद खटकेबाज व ग्रामीण भागातील गावरान बोलीतील असल्याने वाचकांच्या मनाला भिडणारे आहेत. त्यातील उपमा रूपके व म्हणी या वाचकांचे लक्ष वेधून घेतात.

## ५.९ रानपालखी या आत्मकथनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये :

'आत्मकथन' या वाङ्मयप्रकारची काही प्रमुख वैशिष्ट्ये 'रानपालखी' या आत्मकथनातून दिसून येतात.

### ५.९.१ दारिद्रयाचे चित्रण :

दारिद्र्य हे 'रानपालखी' या आत्मकथनाचे एक वैशिष्ट्य सांगता येईल. दारिद्र्य हे लेखकाच्या जन्मापासून त्याच्याबरोबर आहे. लेखकाला दारिद्रयाचा सामना करावा लागला. शिक्षण पूर्ण करून त्याला नोकरी मिळाली. परंतु दारिद्रयाने त्याची पाठ सोडली नाही. स्वत:च्या मुलाच्या दुधासाठी एकवेळ त्यांच्याकडे पैसे नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीत लेखकाला आपला जीवन प्रवास करावा लागतो. मोटारसायकलीचे कर्ज फेडताना त्यांना खूप संघर्ष करावा लागतो. शेवटी त्या बँकेचे कर्ज फेडण्यास त्यांच्या विद्यार्थ्यांनी मदत केली.असे अनेक प्रसंग त्यांच्या जीवनात आले. त्यामुळे दारिद्रयाचे चित्रण हे रानपालखीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे असे म्हणावे लागेल.

### ५.९.२ स्त्री दर्शन :

'रानपालखी' या आत्मकथनातील स्त्री ही कष्टाळू त्याबरोबरच सोशिकतेने जीवन जगणारी आहे. स्वत:च्या मुलांबाळांवरती जीव असणारी, रानमातीशी सलगी करणारी, त्याच मातीत राबणारी,

सणावारात मुलांना समाधाने जेऊ घालणारी, गावातील रीतिरिवाज जपणारी, पतिनिष्ठ असणारी, ग्रामदेवतांना नैवेद्य नारळ करणारी, फाटका गळका संसार फुलवणारी, आजारपणान पतीची सेवा करणारी, त्याचबरोबर नवऱ्याच्या मित्रांचा जातीने पाहुणचार करणारी अशा वेगवेगळ्या रूपातील स्त्रीच्या स्वभावाचे दर्शन रानपालखीतून झालेले आहे.

**५.९.३ ग्रामीणता :**

'रानपालखी' या आत्मकथनातील अनेक वैशिष्ट्यांपैकी ग्रामीणता हे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही ग्रामीण संस्कृतीमध्ये झालेली असल्याने त्यांच्या मनावरती ग्रामीणतेचा ठसा उमटलेला आहे. तो कायमचा राहतो. त्यामुळे लेखक जरी व्यवसायाच्या निमित्ताने शहरात वास्तव्याकरिता गेला असला तरी त्याच्या साहित्यातून ग्रामीण संस्कृतीचे, ग्रामीण जीवनातील सण, उत्सव, खेळ यांचे यथार्थ दर्शन घडले आहे. त्यामुळे ग्रामीण शब्दांचा समावेश पदोपदी झालेला आहे.

पेदाड - दारु पिणारी व्यक्ती, पातीव - पिकाची काकरी, कालवण - भाजी, हाटील - हॉटेल, कुळव - शेतीचे अवजार, बोकाड - शेळीचे पिल्लू, बोकड, मजी - म्हणजे, हुडक - शोधणे, सकरात - मातीचे भांडे, गाडगे, गुंतीव - बांधणे, म्होर - पुढं, बाटकाला - ज्वारीच्या ताटाला इत्यादी.

अशा अनेक ग्रामीण संस्कृतीमधील शब्दांचा समावेश रानपालखीत झाला आहे. तसेच ग्रामीण भागात वापरल्या जाणाऱ्या म्हणींचा, शेतीत वापरल्या जाणाऱ्या अवजारांचा तसेच सुतार, बांधकाम करणारा गवंडी यांच्या अवजरांच्या नावाचा उल्लेख रानपालखीतून झाला आहे.

**५.९.४ सामाजिकता :**

कोणत्याही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण तो ज्या समाजात संस्कृतीमध्ये वाढतो तेथील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, भौगोलिक वातावरणाचा परिणाम त्या लेखकाच्या वैचारिक जडणघडणीवर झालेला असतो. त्यामुळे त्याची साहित्यनिर्मिती त्याच्या समाजाला बाजूला ठेवून त्याची कलाकृती निर्माण होत नाही. त्याने निर्माण केलेल्या कलाकृतीत समाजाचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे पडलेले असते.

लेखकाला कोणतीही कलाकृती निर्माण करताना सामाजिक घटकांचा विचार करावाच लागतो. त्याला सामाजिक बांधीलकी ठेवावी लागते. कलाकृतीला अनुरूप अशा पार्श्वभूमीवर आपणांस

'रानपालखी' या आत्मकथनाचा विचार करावा लागतो. रानपालखीचा नायक ज्या भौगोलिक वातावरणात वाढला गेला. त्याच भागातील काही संस्कारांशी तो बांधला गेला. त्यामुळे त्याची वैचारिकता त्या वातावरणात पोसली गेली. त्यामुळे लेखकाच्या प्रतिभेवर ती तत्कालीन परिस्थितीचा, वातावरणाचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याचबरोबर लेखकाने गावासाठी, गावातील लोकांसाठी खूप गोष्टी केल्या. त्यातून त्याची सामाजिक बांधीलकी दिसून येते. वरील सर्व बाबींचा विचार करता रानपालखी या आत्मकथनात सामाजिकतेचे अधिष्ठान लाभले आहे असे म्हणावे लागते.

## ५.१० मुखपृष्ठ व शीर्षकाची यथार्थता :

व. बा. बोधे यांच्या आत्मकथनाचे 'रानपालखी' हे शीर्षक लक्षवेधी असून आकर्षक व समर्पक आहे. लेखकाची रानमातीवरील श्रद्धा अनेक प्रसंगांतून व्यक्त होत आहे. आत्मकथनातील शब्दांना रानमातीचा सुगंध आहे. बोधेंच्या सहज सुंदर भाषाशैलीमुळे रानपालखीच्या मनावर खोल ठसा उमटतो. मुखपृष्ठावरील चित्र हे अत्यंत सूचक आहे. मुखपृष्ठावरील चित्रात विस्तीर्ण पसरलेल्या माळरानातील वाट चालणारी व्यक्ती आहे. त्या चित्राच्या पार्श्वभूमीवर रानपालखीला नाव दिले असावे. निसर्गाशी ओढ असणारा पण परिस्थितीशी सामना करणारा, आंतरआत्मा देहाच्या पालखीत बसून रानोमाळच्या दृश्यांचा वेध घेणारा आहे. असे चित्रकार श्रीकृष्ण ढेरे यांना या प्रतीकात्मक चित्राद्वारे सुचवायचे आहे असे मला वाटते.

'रानपालखी' हे शीर्षक आशयाची सुसंगत आहे. रानमातीतून चालताना लेखकाला आलेल्या अनुभवांची अक्षर यात्रा म्हणजे बोधेंची 'रानपालखी' होय.

## ५.११ समारोप :

'रानपालखी' या आत्मकथनाचा एकूणच आवाका लक्षात घेण्यासाठी आत्मकथनातील वाङ्मयीन गुणवत्ता शोधावी लागते. प्रस्तुत प्रकरणात 'रानपालखी' या आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे. आत्मकथनातील प्रसंग, संवाद, भाषाशैली, निवेदनशैली, वातावरण, प्राणिवर्णन इ. वाङ्मयीन घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

इतर आत्मकथनाच्या तुलनेने 'रानपालखी' हे आत्मकथन वेगळ्या वळणाचे वाटते. ते त्याच्या वाङ्मयीन गुणवत्तेमुळे असे म्हणता येईल.

## ५.१२ निष्कर्ष :

१. 'रानपालखी' या आत्मकथनाची भाषा ही नागर व ग्रामीण बोली भाषा आहे.

२. 'रानपालखी' या आत्मकथनातून व. बा. बोधे यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू अधोरेखित होतात.

३. 'रानपालखी' या आत्मकथनातून अनेक जाती-जमातींचे जीवनदर्शन, राहणीमान, सणउत्सव, संस्कृती इत्यादीचे चित्रण आले आहे.

४. व. बा. बोधे यांनी आपल्या गावातील रूढी, परंपरांचे, देवतांचे त्याचबरोबर जत्रेचे चित्रण रानपालखीतून केले आहे.

५. रानपालखीतून व. बा. बोधे यांनी बदलत्या खेड्याचा व खेड्यातील जीवनाचा सविस्तर आढावा प्रस्तुत आत्मकथनात घेतला आहे.

६. बोधे यांनी आपल्या जीवनविषयक अनुभवांचे, व्यक्ती म्हणून झालेल्या जडणघडणीचे, जीवनातील मान-सन्मान, अपमानांचे आणि संघर्षाचे हृदयस्पर्शी व कलात्मक दर्शन रानपालखीतून घडवले आहे.

७. बोधे यांच्या सामाजिक व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे दर्शन रानपालखीतून घडते.

८. लेखक बोधे यांच्या जीवनाची वाटचाल व त्यांच्या आवडी-निवडी जाणून घेण्याचा दृष्टीने 'रानपालखी' महत्त्वाची ठरते.

९. 'रानपालखी' या आत्मकथनात ग्रामीण भागात खेळल्या जाणाऱ्या खेळांचा त्याचबरोबर खेळात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचे चित्रण येते.

१०. रानपालखीतून ग्रामीण म्हणींचा, उपमांचा त्याचबरोबर मराठी चित्रपटातील काही गीतांचा यथायोग्य वापर झालेला दिसतो.

## ५.१३ संदर्भ सूची :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. भोसले सुधाकर | : | 'रानपालखी नव्हे रानफळ एक शोधनिबंध', दै. पुढारी, ३१ ऑगस्ट २००३, पृ. ५ (सातारा) एक परिसंवाद. पृ.४ |
| २. | व. बा. बोधे | : | 'रानपालखी' संस्कृती प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, सन २००३ |
| ३. | डॉ. पाटणे यशवंत | : | भावरम्य शैलीत साकारलेली अक्षरयात्रा - एक शोधनिबंध, दै. पुढारी, ३१ ऑगस्ट २००३, पृ. ५ (सातारा) एक परिसंवाद. |
| ४. | साठे आ. वि. | : | दै. तरुण भारत, रविवार दि. १३ जुलै २००३, साहित्यात रमलेल्या प्राध्यापकाचे आत्मकथन, |
| ५. | डॉ.भोसले सुधाकर | : | उनी, पृ. २ |
| ६. | डॉ. शहा रमणलाल | : | दैनिक पुढारी, ३१ ऑगस्ट २००३, पान ५, (सातारा) एक परिसंवाद |
| ७. | व. बा. बोधे | : | रानपालखी, संस्कृती प्रकाशन, पुणे २००३, पृ.३१-३१ |

-----x-----